सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

(सामान्य प्रशासन विभाग- कर्मचारी भरती/पदोन्नती कक्ष)

प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे-२०२२ योजनेअंतर्गत "करार पध्दतीने" पदभरतीबाबत.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये प्रधानमंत्री आवास योजना अंमलबजावणी करणेसाठी महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र.प्रआयो.२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२(सेल), दि. ९ डिसेंबर, २०१५ नुसार शहरस्तरीय तांत्रिक कक्षाकडे खालील नमुद करण्यात आलेली पदे ११ महिने कालावधीकरीता **"करार पध्दतीने"** भरणेची असून पात्र व इच्छूक उमेदवारांकडून दि. १३/०७/२०२६ अखेर कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ.नं.	पदांचे नाव	पदसंख्या	परिश्रमिक एकत्रिक मोबदला	अर्हता
१	सिव्हील इंजिनिअर	०१	रु. ६०,०००/- (दरमहा)	i. Post graduate in Civil Engineering. ii. At last 5 years of experience in procurement, design, and supervision of infrastructure works. iii. Ability to assist ULB to set standards and procedures for ensuring quality and monitoring compliance. iv. Prior experience as municipal engineer will be an added advantage. v. Fluency in local language essential.
२	टाऊन प्लॅनिंग स्पेशालिस्ट	०१	रु. ६०,०००/- (दरमहा)	vi. Master's degree in Urban Planning or Regional planning or Architecture Management with at last 5-7 years experience in a managerial position vii. Having experience in project management with 5 years in a managerial position. viii. Experience in working with large scale urban developinent / affordable housing/ slum development projects/programmes. ix. Experience in implementing urban reforms for states and ULBs.

उमेदवारांना सर्वसाधारण सुचना व अटी:-

१. उमेदवाराने अर्जासोवत स्वत:चे अलिकडच्या काळातील फोटोसह शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र (S.S.C., H.S.C. ग्रॅज्युएशन, पोस्ट ग्रॅज्युएशन सर्टीफिकेट) अनुभव, आधार कार्ड, जन्म तारखेचा दाखला, इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह अर्ज मा. आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचे नांवे फक्त मध्यवर्ती आस्थापना विभाग, आपटा पोलिस चौकीशेजारी, पाण्याच्या टाकी, पहिला मजला, सांगली येथे सादर करणेचा आहे. टपालाने अथवा अन्य पद्धतीने मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अजांचा कोणत्याही परिस्थितीत विचार करण्यात येणार नाही.

२. उपरोक्त पदावर नियुक्तीचा कालावधी हा शासन अनुदानावर अवलबून राहील.

३. एका पेक्षा जास्त पदासाठी अर्ज करावयाचे असल्यास प्रत्येक पदासाठी वेगवेगळे व परिपूर्ण अर्ज करावेत.

४. या पदासाठी जाहिरातीमध्ये दर्शविलेली अर्हता अर्ज करतेवेळी उमेदवारांनी धारण केलेली असणे आवश्यक आहे.

५. प्राप्त अर्जांमधील उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, वय, अतिरीक्त शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि अंतिम वर्षाच्या गुणांची टक्केवारी इ. बाबत छाननी करुन छाननीअंती **अंतिम वर्षाच्या गुणांच्या टक्केवारीनुसार एकास पाच (१ : ५) याप्रमाणे मुलाखतीची यादी तयार करुन मुलाखतीची तारीख, पात्र उमेदवारांना कळविण्यात येईल.** याकरीता उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचा **सद्याचा राहणेचा पत्ता व मोबाईल नंबर व ई-मेल आयडी न चुकता नमूद करावा.**

६. सदर करार तत्वावरील **नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील असून या नियुक्तीचा महानगरपालिका आस्थापनेवरील सेवेशी कोणताही संबंध नाही.** नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महानगरपालिकेच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही अथवा कायदेशीर दाद मागता येणार नाही.

७. परिक्षा/मुलाखती/नेमणुकीसाठी शिफारस यापैकी कोणत्याही टप्यावर टपाल खात्याकडून उमेदवारास वेळोवर पत्र न मिळाल्यास त्यास सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

८. निवड होणाऱ्या उमेदवारांना महानगरपालिकेच्या शर्ती अटीनुसार विहित नमुन्यामध्ये रुपये. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र करुन देणे बंधनकारक राहील.

९. सदर जाहिरातीच्या नियुक्त्या, पदसंख्या, शर्ती अटी यामध्ये बदल कमी अधिक मजकुर इ. बदल या प्रक्रीया रद्द करणाचे अधिकार निम्म स्वाक्षरीकार यांच्याकडे राखुन ठेवणेत आला आहे.

VINAYAK MURALIDHAR SHINDE
Digitally signed by VINAYAK MURALIDHAR SHINDE
Date: 2026.06.29 17:42:08 +05'30'

(विनायक शिंदे)
सहाय्यक आयुक्त, सा.प्र.वि.-कर्मचारी भरती/पदोन्नती कक्ष
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मा. आयुक्तसो यांचे मान्यतेने

क्र.मनपा /साप्रवि-कभपकक्ष/१४१/२०२६
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक - २९/०६/२०२६